पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौडरोड, पुणे

# राष्ट्रीय सेवा योजना

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

# मूल्य शिक्षण कार्यशाळा अंतर्गत श्रमदानातून व्यक्तिमत्व विकास

# विद्यापीठ स्तरीय सात दिवसीय शिबीर

## शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२

**कालावधी** दि. १६ मार्च २०२२ ते २२ मार्च २०२२

१.महाविद्यालयाचे नाव – मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौडरोड, पुणे–३८.

२.प्राचार्यांचे नाव – प्राचार्य डॉ.बाळकृष्ण झावरे – ९५१८३२२४३९

३.कार्यक्रम अधिका–यांचे नाव –१. डॉ.भरत राठोड – ८८८८७९६३५४/९३०९८१५३४९
२. डॉ.निता कांबळे – ९६८९७५७८१२
३. डॉ.महादू बागुल – ७७७४८६८९६६

४.स्वंयसेवकांची संख्या (एकक) – १५० (अक्षरी एकशे पन्नास)

५. **विद्यापीठ स्तरीय शिबिराचे ठिकाण** – मु.पो.होतले,ता.मुळशी, जि.पुणे.
दि. १६ मार्च २०२२ ते २२ मार्च २०२२

## शिबीर अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, राष्ट्रीय सेवा योजना व मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौडरोड,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ स्तरीय " मूल्य शिक्षण कार्यशाळा अंतर्गत श्रमदानातून व्यक्तिमत्व विकास " विद्यापीठ स्तरीय सात दिवसीय शिबीर बुधवार दिनांक – 16 मार्च 2022 ते मंगळवार दि.22 मार्च 2022 या कालावधीत मु. पो. होतले, ता.मुळशी, जि.पुणे येथे यशस्वीपणे शिबीर संपन्न झाले. या शिबीरामध्ये नाशिक, नगर, पुणे या जिल्हयातून एकूण 50 महाविद्यालयातील 150 स्वयंसेवक सहभागी झाले होते.

या शिबीराचे उदघाटन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपसचिव मा.एल.एम. पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी आपल्या मनोगतात सामाजिक बांधिलकी, समाजसेवा, गरीबांची सेवा, देशाची सेवा या विषयी विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळकृष्ण झावरे सर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगितले, तसेच खेडयातील संस्कृती ,रूढी, परंपरा, इतिहास समजून घेतले पाहिजे असे

पौड रोड
पुणे-३८

विचार व्यक्त केले. या उद्घाटन प्रसंगी होतले गावातील सरपंच सौ.धनश्री नवनाथ पालकर, उपसरपंच सौ.पौर्णिमा सचिन जोरी, श्री.अमित तुकाराम शिंदे, श्री.ऋषीकेश भगवान कडू, श्री दत्तात्रय विठ्ठल शिंदे, तसेच समस्थ होतले ग्रामस्थ, कार्यक्रम अधिकारी, डॉ. भरत राठोड, डॉ.निता कांबळे, डॉ.महादू बागूल, डॉ.मेघना भोसले, डॉ.अशोक शेळके,डॉ. एस. बी. शिंदे उपप्राचार्य, प्राध्यापक, सेवक वर्ग उपस्थित होते.

सात दिवसीय शिबिरामध्ये प्रबोधनपर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. विविध वक्ते आणि विषय खालीलप्रमाणे –

दि. 16 / 3 / 2022 – उद्घाटन व
सौ.धनश्री पालकर व श्री.गजानन जाधव – गाव ओळख.
(सरपंच) (ग्रामसेवक)

दि. 17 / 3 / 2022 – श्री.स्वामीराज भिसे – राष्ट्रीय सेवा योजना व व्यक्तीमत्व विकास
– श्री.सागर येवले – प्रसार माध्यमे व युवक

दि. 18 / 3 / 2022 – डॉ.राणी भगत – युवक व वसुंधरा
– श्री.अनिल कैंगार –श्रमदानातून व्यक्तीमत्व विकास व समाज प्रबोधन

दि.19 / 3 / 2022 – श्री.संदीप बर्वे – महात्मा गांधीजीच्या स्वप्नातील भारत
प्रा.निलम पंडीत– आजचा युवक व भारतीय संविधान

दि. 20 / 3 / 2022 – डॉ.संदीप महीम, शिवदुर्ग प्रतिष्ठान – किल्ले संवर्धन
श्री.मनोज गुंजाळ – मी असा घडलो

दि. 21 / 3 / 2022 – श्री.प्रदीप पाटील– जलसंवर्धन काळाची गरज
– वृषाली रणधीर – मी सावित्री बोलतेय

दि.22 / 3 / 2022 – डॉ.सपना राणे – माहिती तंत्रज्ञान व युवकांची भूमिका, समारोप

अशाप्रकारे वरील तज्ञ वक्ते यांनी शिबीरातील स्वयंसेवकांना प्रबोधनपर व व्यक्तीमत्व विकासावर आधारित व्याख्यानाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

दिनांक–16 मार्च ते 22 मार्च 2022 या कालावधीत विविध उपक्रम घेण्यात आली. सर्वप्रथम विद्यार्थ्यांचे गट तयार करण्यात आले. रायगड, तोरणा, सिंहगड तिकोणा, शिवनेरी असे गट पाडण्यात आले. प्रत्येक गटाचा एक लिडर नेमण्यात आला जो की मतदान पद्धतीने निवडून दिले. प्रत्येक स्वयंसेवकांनी ओळख करून दिली. प्रत्येक गटाची जबाबदारी काय असते ते सांगितले. सांस्कृतिक कार्यक्रम, अंधश्रध्दा निर्मुलन, स्वच्छता, पुतळा तयार करणे, कविता, गटचर्चा, गाणे, पोवाडे, पथनाटय, मूक नाटय, स्वरचित गाणे अशाप्रकारे मनाला स्पर्श करणारे लोकांमध्ये स्वार्थीपणा , लैंगिक भेद, अरो

समाजातील गहण प्रश्न मुकनाटयातून सादर करण्यात आले. तसेच राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता तसेच माहिलांचे मासिक पाळी या गंभीर विषयावर जनजागृती करण्यात आली.

या सात दिवसीय शिबिरामध्ये स्वयंसेवकांनी विविध श्रमदानाची कामे केली. सर्वप्रथम होतले गावातील मंदिर परिसर, जिल्हा परिषद शाळा परिसर, अंगणवाडी परिसर, गवत, प्लॅस्टिक, व कचरा वेगळा करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावली. तसेच दुर्गेवाडी या गावातील ग्रामस्वच्छता करण्यात आली. तसेच शाळेतील परिसरातील वृक्षरोपनासाठी खडडे खोदले, टॉयलेटसाठी 8 बाय 10 अंतराचा खड्डा खोदण्यात आला. झाडांना अळी करण्यात आली. तसेच गिरीवन च्या पायथ्याशी दोन पाण्याचे झरे यातून गाळ काढण्यात आला. त्यामुळे रानातील पक्षी व प्राणी यांना पाणी पिण्यासाठी उपयोग होईल अशाप्रकारे पाण्याच्या स्त्रोताचे पुनर्जिवन केले. तसेच गावठाण स्वच्छता, श्रमदान करण्यात आले. सदर शिबिरा मध्ये 150 विद्यार्थी व 6 कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. वरील कामाचे अंदाजे मूल्य 1,60,000/– (एक लाख साठ हजार फक्त) इतके आहे.

या विद्यापीठस्तरीय सात दिवसीय शिबिराचे समारोप दि.22 मार्च 2022 रोजी झाले. या समारोपाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळकृष्ण झावरे होत. तसेच प्रमुख पाहुणे पुणे जिल्हा म.सहकारी बॅंकेचे उपाध्यक्ष मा.सुनिल चांदेरे हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये थोर व्यक्तींचे विचार आत्मसात केले पाहिजे, असा सल्ला दिला. गावातील सरपंच सौ. धनश्री नवनाथ पालकर, सौ.पौर्णिमा सचिन जोरी, श्री. पोपट भाऊ धुडे, श्री.ज्ञानेश्वर दुर्गे, श्री.अमित तुकाराम धिडे, श्री.ऋषीकेश कडू, श्री.दत्तात्रय विठठल धिडे, गावातील ग्रामस्थ , तसेच महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ.एस.बी.शिंदे, प्राध्यापक, सेवकवर्ग, कार्यक्रम अधिकारी– डॉ.भरत राठोड, डॉ.निता कांबळे, डॉ.महादू बागूल, डॉ.अशोक शेळके, डॉ.मेघना भोसले हे सर्वजण उपस्थित होते.

अशाप्रकारे सात दिवसीय शिबीर यशस्वीपणे पार पडले.

Program Officer
National Services Scheme
Mamasaheb Mohol College,
Paud Road - 38

PRINCIPAL
Mamasaheb Mohol College
Paud Road, Pune - 411 038.